ही वाट दूर जाते

ही वाट दूर जाते स्वप्नामधील गावा
माझ्या मनातला का तेथे असेल रावा?
जेथे मिळे धरेला आभाळ वाकलेले
अस्ताचलास जेथे रविबिंब टेकलेले
जेथे खुळ्या ढगांनी रंगीन साज ल्यावा
घे साउली उन्हाला कवळून बाहुपाशी
लागून ओढ वेडी खग येती कोटरासी
एकेक चांदणीने नभदीप पाजळावा
स्वप्नामधील गावा स्वप्नामधून जावे
स्वप्नातल्या प्रियाला मनमुक्त गीत गावे

स्वप्नातल्या
सुखाचा स्वप्नीच वेध घ्यावा

गीत - शांता शेळके

स्वर्गाहुनही प्रिय आम्हांला

स्वर्गाहुनही प्रिय आम्हांला
अमुचा सुंदर भारत देश
आम्ही सारे एक जरीही नाना जाती नाना वेष
या भूमीच्या आम्ही कन्या कोमल भाव मनी
फूलकोवळ्या तरी प्रसंगी होऊ रणरागिणी
आवेशाने घुसू संगरी चढवुनिया रणवेष
श्रीरामाचे शीकृष्णाचे अजून आहे स्मरण मनास
वीर शिवाजी प्रताप बाजी थोर
आमुचा हा इतिहास
रक्तामधुनी वीज वाहते उरात भरतो नव आवेश
हिमायलापरी शीतल आम्ही,
आग पेटती परि उरात
पाऊल परके पडता येथे बळ वज्राचे याच करांत
या देशाची गौरवगाथा हाच अम्हांला दे आदेश

विकल मन आज

विकल मन आज झुरत असहाय !
नाही मज चैन, क्षण क्षण झरति नयन
कोणा सांगू?
ही चांदरात, नीज नच त्यात
विरह सखि मी कुठवर साहू?
नाही मज चैन,
क्षण क्षण झरति नयन
कोणा सांगू?

गीत - शांता शेळके



सांग सांग नाव सांग

सांग सांग सांग सांग
काय रं?
तुझं नाव, तुझं गाव, तुझं नाव, तुझं गाव
नाव सांग सांग सांग, गाव सांग !
चाललीस तुरुतुरु, अढी नगं मनी धरू
सांग सांग सांग, नाव सांग !
जा रं !
गोडंवानी नगं हसू, नाव गाव नगं पुसू
थांब थांब थांब, जरा थांब !
व्हट उघडुन सखू माझ्यासंगं तू बोल
शब्दाशब्दाला घे मोत्यापवळ्याचं मोल
तुझ्या मागं मागं आलो, तुझ्यापायी येडा झालो
नाव सांग सांग सांग, गाव सांग !
नार नवेली मी रूप लाखात एक
जाते जपून जपून तालेवाराची लेक
तुझ्या डोळ्यिचं बाण, झाला कासावीस प्राण
नाव गाव नगं पुसू थांब थांब थांब !
चाललीस तुरुतुरु
गोडंवाणी नगं हसू
अढी नगं मनी धरू
नाव गाव नगं पुसू
थांब थांब थांब जरा थांब !
नाव सांग सांग सांग, गाव सांग !
जरा थांब थांब थांब, जरा थांब !
घोडं बांध बांध बांध, घोडं बांध !

गीत - शांता शेळके

मी नवनवलाचे स्वप्न काल

तू गुपित कुणाला सांगू नको आपुले
मी नवनवलाचे स्वप्न काल पाहिले !
स्वप्नात सावळा हरी
ये वाजवीत बासरी
त्या मधुर स्वरांनी मन माझे मोहिले !
कर घालुनी माझ्या गळा
गुजगोष्टी करी सावळा
हलकेच तये अधरास अधर जुळविले !
मी दचकुन उठले गडे
परि घडू नये ते घडे
कपट्याने माझे हृदयच गे चोरिले !

गीत - शांता शेळके

ऋतु हिरवा
ऋतु बरवा

ऋतु हिरवा ऋतु बरवा, पाचूचा वनि रुजवा
युगविरही हृदयावर सरसरतो मधूशिरवा
भिजुनी उन्हे चमचमती,
क्षण दिपती क्षण लपती
नितळ निळ्या अवकाशी
मधुगंधी तरल हवा
मनभावन हा श्रावण, प्रियसाजण हा श्रावण
भिजवी तन भिजवी मन हा श्रावण
थरथरत्या अधरांवर प्रणयी संकेत नवा
नभी उमटे इंद्रधनू, मदनाचे चाप जणू
गगनाशी धरणीचा जुळवितसे सहज दुवा

गीत - शांता शेळके

Created By
DBDHAKUL

मागते मन एक काही

मागते मन एक

काही, दैव दुसरे घडविते

उमलण्या आधीच

कैसे फूल पायी तुडविते !

खेळ नियती

खेळते की पाप

येते हे फळा

वाहणाऱ्या या जळाला

कोण मार्गी अडविते?

ईश्वरेच्छा हीच किंवा

संचिताचा शाप हा

चंद्ररेखा प्रतिपदेची

कोण तिमिरी बुडविते?

गीत – शांता शेळके

माजे रानी माजे मोगा

माजे रानी माजे मोगा
तुजे दोल्यांत सोधता ठाव !
माजे राजा माजे मोगा
तुजे नावाक जोडता नाव
फुलाफुलाक पुशीत आयलो
तुजेमाजे प्रीतिचो गाव
काळ्याकाळ्या दोळ्यान् तुज्या
माज्या वाटा वाटा मेळतात माका
तुज्या छातीर ठेवता माथा
फुलाभाशेन भाशेन हलकी दुखा
तुजे पायाक रुतता काटा
माजे काळजाक लागता घाव !
गोऱ्यागोऱ्या रंगांन् तुज्या
माज्या दोळ्याक दोळ्याक चांदऱ्या राती
तुज्या ओठार सपना माजी
माजे गाणे गाणे होऊन येती
तुजे भितूर माजे मना
दर्यावैल्या किरणाचो भाव

गीत – शांता शेळके

माजो लवताय् डावा डोळा

माजो लवताय् डावा डोळा
जाइजुईचो गजरो माळता
रतनअबोली केसान् फुलता
काय शकुन, शकुन गो सांगताय् माका?
बाय, माजो लवताय् डावा डोळा !
माजे कानार भंवर भोवता
माजे गालाक बाय भिडता
सगळ्या अंगार शिर्शीर येता
माजो पदर वाऱ्यार उडता
मनचो बकुळ गो परमाळता
काय शकुन, शकुन गो
सांगताय् माका?
बाय, माजो लवताय् डावा डोळा !
माजे दोळ्यांत सपनाच्या वाटेर
कोन बाय येता न जाता?
माजे ओठार माजेच गाणे
कोन बाय येऊन गाता?
माजोच बोल बाय उलैता
काय शकुन, शकुन गो,
सांगताय् माका?
बाय, माजो लवताय् डावा डोळा !

गीत – शांता शेळके

माज्या मुखार गर्भच्छाया

माज्या मुखार

गर्भच्छाया, कुशीक जाले ओझे
तेव्हा बाय कळून आयले नशीब माका तुजे !
फुलून येता चाफेकळी मनाक येता बहर
ओठावयल्या अमृताचे होते बाय जहर
जरीपदर उडून जाता जीव मरता लाजे
तेव्हा बाय कळून आयले नशीब माका तुजे !
देवाची गो नोवरी तिचो पाषाणाचो पती
घर नाही दार नाही संसाराची माती
सौभाग्याचा फास तिच्या गळ्यामधे साजे

तेव्हा बाय कळून आयले नशीब माका तुजे !

गीत – शांता शेळके

माज्या सारंगा राजा सारंगा

माज्या सारंगा,
राजा सारंगा
डोलकरा रं धाकल्या दीरा रं
चल जावया घरा !
आज पुनवा सुटलंय दमानं
दरियाच्या पान्याला
आयलंय उदान
पिऊन तुफानवारा
शीड फाटलं धावतं पाठी
तुटलंय् सुकानू
मोरली काठी
फेसाल पान्याचा घेरा
कोलीवारा रं राहिला दूर
डोलां लोटिला पान्याचा पूर
संबाल संसार सारा

गीत – शांता शेळके

माझी न मी राहिले

माझी न मी राहिले
तुजला नाथा सर्व वाहिले
माझी न मी राहिले !
पहिली ती भेट होती
हसले मी गाली ओठी
कळले ना मला वेडीला
वेड लावून गेली प्रीती
कशी फुलापरी उमलले
चांदण्याचे सूर झाले
गाईली मी धुंद गाणी
धुंद होती रातराणी
धुंद होते जीव दोन्ही
रंग रंगांतुनि मिसळले
सुख माझे ठेवु कोठे?
मज माझा हेवा वाटे
नच काही उणे संसारी
किती आनंद हृदयी दाटे
जन्मजन्मी तुझी जाहले

गीत - शांता शेळके

माझ्या मना रे ऐक जरा

माझ्या मना रे ऐक जरा
हळवेपणा हा नाही बरा !
मधुमास तो मधुयामिनी
दिसले कुणी हसले कुणी
पहिलाच तो क्षण जीवनी
पडली कशी मज मोहिनी?
का भास तो होईल खरा?
आवेग तो श्वासातला
ते ओठ होते कापरे
उभयांतला उपचारही
विरली क्षणातच अंतरे
गेला अचानक तोल पुरा !
फसवेच ते वय कोवळे
फसव्याच त्या संवेदना
स्वप्नास निर्दय जाग ये
मागे मुक्या उरल्या खुणा
अंधार येई काय भरा

गीत – शांता शेळके

माझ्या मायेच्या माहेरा

माझ्या मायेच्या माहेरा मला कधी नेसी?

मायबाप विठ्ठला रे, कधी भेट देसी?
रामकृष्ण हरी ! रामकृष्ण हरी !
ज्ञानियांचा राजा तुझा बाळ लडिवाळ
अवघे वैष्णव तुझे लाडके गोपाळ
मला एकलीला का रे, दूर मोकलीसी?
मायबाप विठ्ठला रे, कधी भेट देसी?
तो हा विठ्ठल बरवा, तो हा माधव बरवा
रामकृष्ण हरी ! रामकृष्ण हरी !
टाळ मृदंगाची साथ नामाचा सोहळा
भीवरेच्या तीरी नाचे धुंद संतमेळा
दुरावले कैशी देवा मीच दर्शनासी?
मायबाप विठ्ठला रे, कधी भेट देसी?

गीत – शांता शेळके

माणुसकीचे पाईक आम्ही

एक दोन तीन !

माणुसकीचे पाईक आम्ही असे वारसा हा प्राचीन !

सज्जन त्यांचे आम्ही
साथी, ब्रीद सांगते निधडी छाती
त्यांच्यासाठी धावुन जाऊ,
मरणही माथा झेलून घेऊ
भला तयाला धरू उराशी
उच्च असो वा अनाथ दीन !

एक दोन तीन !

माणुसकीचे केवळ लांछन,
दुर्जन तो तो अमुचा दुष्मन
निर्भयतेने गर्जत 'हर हर', संगर त्यांशी करू भयंकर
दुष्ट तयाचे दमन करावे मार्ग नसे हा अम्हा नवीन !

एक दोन तीन !

एक जाणतो आम्ही प्रीती– तोच
वेद, ती गाथा, पोथी;
मंगल पावन प्रीतीसाठी
विष हो अमृत अमुच्या ओठी
या प्रीतीच्या चरणांवरती विश्व होतसे अवघे लीन !

एक दोन तीन !

गीत – शांता शेळके

मानत नाही श्याम

मानत नाही श्याम
मन पापी मानत नाही !
लाज सांडिली,
त्यजिली भीती
अदय प्रियावर
केली प्रीती
निशिदिनि चैन न काही !
भुलले त्याला
पडले मोही
सहज विसरला
तो निर्मोही
स्मरणी आणित राही मी
मन पापी मानत नाही !

गीत – शांता शेळके

मारू बेडुकउडी गड्यांनो

मारू बेडुकउडी गड्यांनो
घालू या लंगडी
लपाछपी खेळता देउ या
झाडामागे दडी !
सुट्टी लागली सरली शाळा
कोण पहाटे उठतो खुळा !
"अभ्यासाला
बसा !" कुणी ना
ओरडते घडीघडी !
गावाबाहेर वाहे नदी
झाडे बघती पाण्यामधी
सळसळणाऱ्या लाटांमध्ये
घेईल कोणी बुडी !
कुणी पाडतिल चिंचा बोरे
"एक आकडा मलाही दे रे?"
झाडाखाली कुणी बापडा
लाविल लाडीगुडी !

गीत – शांता शेळके

जिवलग

माझे मज सांगाती
मी आळविते जयजयवंती !
चंद्र उगवला वर पुनवेचा
चांदण्यास ये गंध जुईचा
प्राणांमधुनी कंप सुखाचा
आलापांतून भाव रंगती

मी आळविते जयजयवंती !

या असल्या चंदेरी रात्री
बिंब तयांचे माझ्या नेत्री
रोमांचित मी अवघ्या गात्री
स्वरांतुनी दरवळते प्रीती

मी आळविते जयजयवंती !

गीत – शांता शेळके

मी डोलकर डोलकर

वल्हव रे नाखवा हो वल्हव रे रामा
मी डोलकर डोलकर डोलकर दर्याचा राजा
घर पान्यावरी बंदराला करतो ये जा !
आयबापाची लाराची लेक मी लारी
चोली पीवली गो नेसलंय अंजीरी सारी
माज्या केसान् गो मालीला फुलैला चाफा
वास परमालता वाऱ्यानं घेतंय झेपा
नथ नाकानं साजीरवानी
गला भरुन सोन्याचे मनी
कोलिवाऱ्याची मी गो रानी
रात पुनवेला नाचून करतंय् मौजा
या गो दर्याचा दर्याचा दर्याचा दरारा मोठा
कवा पान्यावरी उठतान डोंगरलाटा
कवा उदानवारा शिराला येतंय फारू
कवा पान्यासुनी आबाला भिरतंय तारू
वाट बगून झुरते पिरती
मंग दर्याला येतंय भरती
जाते पान्यानं भिजून धरती
येतंय भेटाया तसाच भरतार माजा
भल्या सकालला आबाल झुकतं हे खाली
सोनं चमचमतं दर्याला चढते लाली
आमी पान्यामंदी रापण टाकतो जाली
धन दर्याचं लुटून भरतो डाली
रात पुनवेचं चांदनं प्याली
कशी चांदीची मासली झाली
माज्या जाल्यात व्होऊन आली
नेतो बाजारा भरून म्हावरां ताजा

गीत – शांता शेळके

मी नवनवलाचे स्वप्न काल

तू गुपित कुणाला सांगू नको आपुले
मी नवनवलाचे स्वप्न काल पाहिले !
स्वप्नात सावळा हरी
ये वाजवीत बासरी
त्या मधुर स्वरांनी मन माझे मोहिले !
कर घालुनी माझ्या गळा
गुजगोष्टी करी सावळा
हलकेच तये अधरास अधर जुळविले !
मी दचकुन उठले गडे
परि घडू नये ते घडे
कपट्याने माझे हृदयच गे चोरिले !

गीत – शांता शेळके

मीही अशी भोळी कशी ग

मीही अशी भोळी कशी ग?
भोळी खुळी !
मी लाजले
जे मना वाटले
ते राहिले माझ्याचपाशी !
मी जाणिले ना मनी काय आले?
एका कळीचे कसे फूल झाले?
अंग अंग माझे नवे रूप ल्याले
डोळ्यांमध्ये चांदणे धुंद ओले
आले कुठे मी स्वप्नदेशी?
ओठांत आले मुके गुज बाई
मला बावरीला सुचेनाच काही
भरे कंप देही झुके पापणीही
शब्दांविना अंतरी सूर गाई
ते गुंजते आता स्वतःशी

गीत – शांता शेळके

ये अबोली लाज गाली

ये अबोली लाज गाली, रंग माझा वेगळा
ऐक राणी गूज कानी हा सुखाचा सोहळा
मी दिले काही तुला ग
मीही राजा घेतले
ये कळी पहिली सुखाला
गुपित सांगे आतले
स्वप्न अधरी, स्वप्न पदरी, भाव रुजला कोवळा
पाकळीच्या पावलांच्या
गंधगहिऱ्या चाहुली
स्वप्न ये हातात माझ्या
होऊनिया बाहुली
बाहुलीला जोजवीता गीत येते या गळा
जे हवे ते सर्व लाभे
काय मागू मी दुजे?
चित्र भावी जीवनाचे
बिंब हे माझेतुझे
लागला साऱ्या घराला हा असा याचा लळा

गीत – शांता शेळके

राघुमैना रानपाखरं गाउ

सोनसकाळी सर्जा सजला
हसलं हिरवं रान
राघुमैना रानपाखरं गाऊ लागली गान !
झुळुझुळु आला पहाटवारा
हळूच जागवी उभ्या शिवारा
झाडं वेली नीज
सांडती नाचनाचतं पान
राघुमैना रानपाखरं
गाऊ लागली गान !
पिढ्यापिढ्यांचं पातक सरलं
शिवनेरीला शिव अवतरलं
शिवरायांच्या मंगल चरणी
पावन झाली अवघी धरणी
जयभवानी बोल गर्जती आज
पाचही प्राण

गीत – शांता शेळके

रूपसुंदर सखी साजिरी

रूपसुंदर सखी साजिरी गुणखनी
दूर जाता उरे काय या जीवनी?
पाहु कोठे अता
मोहना ती प्रिया?
शांतवू मी कसा
विकल हृदयास या?
प्रीतीसुम लोपले एकदा
उमलुनी !
रमविती ना जीवा रम्य संध्याउषा
काय मजला अता
पौर्णिमेची निशा?
आग ओली झरे शीत
ज्योत्स्नेतुनी !

गीत – शांता शेळके

रूपास भाळलो मी

रूपास भाळलो मी भुललो तुझ्या गुणाला
मज वेड लाविले तू सांगू नको कुणाला !
एकान्त पाहुनीया जे तू मला म्हणाला,
ऐकून लाजले मी सांगू नको कुणाला !
चंद्रा ढगांतुनी तू हसलास का उगा रे?
वाकून खालती अन् का ऐकलेस सारे?
जे ऐकले तुवा ते सांगू नको कुणाला !
वाऱ्या तुझी कशाने चाहूल मंद झाली?
फुलत्या फुला कशाला तू हासलास गाली?
जे पाहिले तुवा ते सांगू नको कुणाला !
हे गोड रूप ऐसे निरखीन मी दुरून
पाण्या अशीच ठेवी छाया उरी धरून
धरलेस जे उरी ते सांगू नको कुणाला !
हा लाजरा शहारा पाहील काय कोणी?
करतील का चहाडी हे लाल गाल दोन्ही?
गालांत रंगले जे सांगू नको कुणाला !

गीत – शांता शेळके

रेशमाच्या रेघांनी

रेशमाच्या रेघांनी लालकाळ्या धाग्यांनी
कर्नाटकी कशिदा मी काढिला
हात नका लावू माझ्या साडीला !
नवी कोरी साडी लाखमोलाची
भरली मी नक्षी फूलवेलाची
गुंफियले राघूमोर, राघूमोर जोडीला
हात नका लावू माझ्या साडीला !
जात होते वाटंनं मी तोऱ्यात
अवचित आला माझ्या होऱ्यात
तुम्ही माझ्या पदराचा शेव का हो ओढिला?
हात नका लावू माझ्या साडीला !
भीड काही ठेवा आल्यागेल्याची
मुरवत राखा दहा डोळ्यांची
काय म्हणू बाई बाई तुमच्या या खोडीला
हात नका लावू माझ्या साडीला !

गीत – शांता शेळके

लाख दिवे लखलखती

लाख दिवे लखलखती
तारा जणू नभा हसती
दीपावली येई आज आनंदा ये भरती
बाला किती अंगणात
रंगावली रेखितात
भरजरीची नववसने तनुवरती झगमगती
पंचारती करी उजळे
चंद्रज्योती नयनी खुले
पतीलागी प्रेमभरे ओवाळिती नवयुवती
मंगलदिन मंगलसण
देई जगा संजीवन
मंगलमय भाव नवे, नव
आशा मनी फुलती

गीत – शांता शेळके

वहिनी माझी हसली ग

वहिनी माझी हसली ग वहिनी माझी हसली
आजवरी जी दादावरती उगाच होती रुसली
वहिनी हसता कणकण हासे
भवती सांडले सोनकवडसे
घरदाराला फुटले हासू नवीन शोभा दिसली
वहिनी हसता हसले अंगण
अंगणातले अन् वृंदावन
वहिनी पाणी घालू लागता तुळस कशी रसरसली
वहिनी हसता हसले घुसळण
ताकावर ये लोणी उसळुन
खुदुखुदु हसतो भात चुलीवर उकळी फुटली कसली?
हासत हासत पदर बांधुनी
भरभर कामे करते वहिनी
तो शकुनाचा हात लागता घरी लक्ष्मी दिसली
हसू वहिनीच्या गाली दिसता
दादा हसला वहिनी हसता
हरवुन गेली होती गंमत फिरुनी आज गवसली

गीत – शांता शेळके

वादलवारं सुटलं गो

वादलवारं सुटलं गो
वाऱ्यानं तुफान उठलं गो
भिरभिर वाऱ्यात
पावसाच्या माऱ्यात
सजनानं होडीला पान्यात लोटलं
वादलवारं सुटलं गो !
गडगड ढगांत बिजली करी
फडफड शिडात धडधड उरी
एकली मी आज घरी बाय
संगतीला माझ्या कुनी नाय
सळसळ माडांत
खोपीच्या कुडात
जागनाऱ्या डोल्यांत सपान मिटलं
वादलवारं सुटलं गो !
सरसर चालली होडीची नाळ
दूरवर उठली फेसाची माळ
कमरेत जरा वाकुनिया
पान्यामंदी जालं फेकुनिया
नाखवा माजा
दर्याचा राजा
लाखाचं धन यानं जाल्यात लुटलं
वादलवारं सुटलं गो !

गीत – शांता शेळके

विकल मन आज

विकल मन आज झुरत असहाय !
नाही मज चैन, क्षण क्षण झरति नयन
कोणा सांगू?
ही चांदरात, नीज नच त्यात
विरह सखि मी कुठवर साहू?
नाही मज चैन,
क्षण क्षण झरति नयन
कोणा सांगू?

गीत – शांता शेळके

विकल सांजवेळी डोळ्यांत

विकल सांजवेळी
डोळ्यांत आले पाणी

फिरून आठवे रे चुकली प्रेमकहाणी
उदास होता वारा, उदास नदीकाठ
मुकेच झाले ओठ गिळून सारी गाणी
चुकले कुठे काही कळले कसे नाही
घेरल्या दिशा दाही अशुभ

सावल्यांनी

गीत – शांता शेळके

विहीणबाई विहीणबाई उठा

विहीणबाई विहीणबाई उठा आता उठा
भातुकलीचा साऱ्या तुम्ही केला चट्टामट्टा !
पसाभर शेंगदाणे पसाभर गूळ
एकटीनं फस्त केलं लागलं का खूळ?
खादाडखाऊ विहीण म्हणून सारी करती थट्टा !
कुठुन मेलं बाहुलीचं लग्न काढलं आम्ही?
विहीण म्हणून नशिबी आलात हो तुम्ही !
बाळी आमची
नाजुक तुमचा बाळ्या केवढा मोठा !
सोन्यासारखी लेक दिली आणि फसलो
भिकाऱ्याशी नातं जोडुन बसलो !
वरमाईचा पोकळ नुसता पाहुन घ्यावा ताठा !

गीत – शांता शेळके

शारद सुंदर चंदेरी राती

शारद सुंदर चंदेरी राती स्वप्नांचा झुलतो झुला
थंड या हवेत घेऊन कवेत साजणा झुलव मला
साजणा रे, मोहना रे, ऐकना रे
तुझ्याचसाठी रे तुझ्याचसाठी
सगेसोयरे मी सांडिले पाठी
मोहन मधुर राती
भराला येऊ दे प्रीती
प्रीतीची हीच ना रीती?
कशाला कुणाची भीती?
झाडामागे चांद हा वरती आला
ये ना, ये ना? आतुर जीव हा झाला
मी भूलावे, स्वैर व्हावे, गीत गावे
वाऱ्यात लहर मंद
फुलांचा मादक गंध
मोगरा चमेली कुंद
जिवाला करिती धुंद
माझ्या देही पुनवचांदणे साजे
प्राणांमध्ये प्रीतीची पावरी वाजे
आज राया, धुंद काया, मोहवाया

गीत – शांता शेळके

शालू हिरवा पाच नि

शालू हिरवा पाच नि मरवा वेणी तिपेडी घाला
साजणी बाई येणार साजण माझा !
गोऱ्या भाळी चढवा जाळी नवरत्नांची माळा
साजणी बाई येणार साजण माझा !
चूलबोळकी इवलीइवली भातुकलीचा खेळ ग
लुटूपुटीच्या संसाराची संपत आली वेळ ग
रेशिमधागे ओढिती मागे व्याकुळ

जीव हा झाला

सूर गुंफिते सनई येथे झडे चौघडा दारी
वाजतगाजत मिरवत येईल घोड्यावरुनी स्वारी
मी वरमाला घालीन त्याला मुहूर्त जवळी आला
मंगलवेळी मंगलकाळी डोळा का ग पाणी?
साजण माझा हा पतिराजा मी तर त्याची राणी
अंगावरल्या शेलारीला बांधीन त्याचा शेला

गीत – शांता शेळके

शूर आम्ही सरदार

शूर आम्ही सरदार आम्हाला
काय कुणाची भीती?
देव, देश अन् धर्मापायी प्राण घेतलं हाती !
आईच्या गर्भात उमगली झुंजाराची रीत
तलवारीशी लगीन लागलं जडली येडी प्रीत
लाख संकटं झेलुन घेईल अशी
पहाडी छाती !
जिंकावे वा कटुन मरावं हेच आम्हाला ठावं
लढुन मरावं, मरून जगावं हेच
आम्हाला ठावं
देशापायी सारी विसरू माया-ममता-नाती !

गीत - शांता शेळके

शोधितो राधेला श्रीहरी !

शारद पुनवा शांत चांदणे कालिंदीच्या तटी
गोपी जमल्या रास रंगला कदंबतरूतळवटी
दिसेना सखी लाडकी परि
शोधितो राधेला श्रीहरी !
इथे पाहतो तिथे पाहतो
मध्येच थबकुन उभा राहतो
बासरी मुकीच ओठांवरी
शोधितो राधेला श्रीहरी !
दरवळलेल्या कुंजानिकटी
इथेच ठरल्या होत्या भेटी
कशी ती वेळा टळली तरी
शोधितो राधेला श्रीहरी !
काय वाजले प्रिय ते पाऊल
तो तर वारा तिची न चाहूल
भास हो फसवा वरचेवरी
शोधितो राधेला श्रीहरी !

गीत – शांता शेळके

शोधू मी कुठे कशी

शोधू मी कुठे कशी प्रिया तुला?
प्रीती का देई साद ही मजला?
दिसे कुणी मज पुन्हा लपते ग
घुमते का शीळ इथे?
पदरी मी भास खुळे जपते ग
हलले का पान तिथे?
वारा हा काही सांगतो मजला !
ओळखीची खूण काही पटते ग
नच झाली भेट जरी
डोळियांच्या पापणीत मिटते ग
उमटे जे बिंब उरी
येती या चाहुली कशा मजला?

गीत – शांता शेळके

साजणी सई ग !

साजणी सई ग !

साजण नाही घरी, सुकली जाई ग !
दिसं गेले किती सखा दूरदेशी गेल्याला
पुशिते मी आसू
त्याच्या रेशमी शेल्याला !
सोन्याच्या ताटामध्ये पक्वान्ने पाच ग !
सख्याच्या आठवाने घास जाईना ग !
चंदनी झोपाळा बाई हलतो ग डुलतो
भरजरी पदराचा शेव मागे झुलतो
पदराला आठवते सखयाची बोली ग !
ऐकताना होते माझी पापणी ओली ग !

गीत – शांता शेळके

सारखा काळ चालला पुढे

विश्वचक्र हे अविरत फिरते
मरणामधुनी जीवन सरते
अश्रू आजचे उद्या हासती नवल असे केवढे !
सारखा काळ चालला पुढे
कुणाचे कोणावाचून अडे?
सारखा काळ चालला पुढे

शिशिर नेतो हिरवी पाने
झाड उभे हे केविलवाणे
वसंत येता पुन्हा आगळा साज तयावर चढे
सारखा काळ चालला पुढे

श्रेष्ठ वीरनर इथे नांदले
रामकृष्णही आले-गेले
जग हे अडले त्यांच्यासाठी, असे न केव्हा घडे
सारखा काळ चालला पुढे

मरणारा तो जगास मुकतो
त्याच्यामागे कुणी न जातो
दु:ख उरी ते कवटाळुनिया
नित्य कुणी का रडे?
सारखा काळ चालला पुढे

गीत - शांता शेळके

सुकुनी गेला बाग

सुकुनी गेला बाग

आठवणींच्या मुक्या पाकळ्या

पडल्या जागोजाग

आज फुलांतुन सुगंध उडले

पाचोळ्यातच पाऊल बुडले

जुन्या हरवल्या पाउलवाटा,

कसा काढणे माग?

त्या तरुखाली एकामेकां

दिल्याघेतल्या आणाभाका

पानांसंगे आशा जाळीत ये ग्रीष्माची आग

पालवीतली विटली नक्षी

झाडांवरती मुकेच पक्षी

गीत गळ्यातच गुदमरले त्या पुन्हा न येई जाग

गीत – शांता शेळके

सुख भरुन सांडते घरीदारी

सुख भरुन सांडते घरीदारी
मज काय उणे या संसारी?
गंगेहुन मन निर्मळ प्रेमळ
सासू नच ही माता केवळ
कर वत्सल फिरता पाठीवरी
मज काय उणे या संसारी?
जशी वाऱ्याची झुळुक अनावर
नणंद तैशी गोड खेळकर
उतरला स्वर्ग या भूमीवरी
मज काय उणे या संसारी?
पूर्वपुण्य मम ये साकारून
पतीचरणांचे घडले पूजन
ही जोड मिळावी जन्मभरी
मज काय उणे या संसारी?

गीत – शांता शेळके

सूर येती विरुन जाती

सूर येती, विरुन जाती
कंपने वाऱ्यावरी, हृदयावरी
या स्वरांचा कोण स्वामी?
की विदेही गीत हे?
हाय अनोखी ही आलापी
कवळिते मजला उरी
बंधनी आहे तरीही
मुक्त झालो आज मी
पंख झालो या स्वरांचे
विहरलो मेघांतरी

गीत – शांता शेळके

सूर लागला आज

सूर लागला आज !

शब्द धावती स्वरांमागुनी ताल धरी पखवाज

सूर लागला आज !

नकळत मिळता, जुळता तारा
सूर ओतिती अमृतधारा
अर्थ आगळा ये आकारा जमता सारा साज !

तान मुलायम येता सुस्वर
शब्द डोलती हिंदोळ्यावर
सप्त सुरांची भरली घागर बरसे वरुनी आज !

गीत – शांता शेळके

संगीतरस सुरस

संगीतरस सुरस
मम जीवनाधार !
सूर ताल लय धून
नटला विविधरंगी
स्वररूप ओंकार !
आनंदघन असा
बरसे नभातून
हा वेद श्रुतिमान
सुखसार !

गीत – शांता शेळके

संपली कहाणी माझी

संपली कहाणी माझी संपली कहाणी !

धुंद चांदण्या त्या राती
संगतीस होती प्रीती
स्वप्नभारल्या जिवाला
आस मीलनाची होती

आस लोपली ती आता म्लान रातराणी !

मुके पाखरू ये कोणी
प्रेमशून्य माझ्या गेही
लळा लावुनी का ऐसा
उडुन आज जावे तेही?

बाहुलीविना त्या दृष्टी अंध दीनवाणी !

अर्थहीन जीवन झाले
प्रेमबंध तुटता सारे
दिशांतून घेरित आले
क्रूर वादळाचे वारे

विनाकिनाऱ्याची राहे रात ही दिवाणी !

गीत – शांता शेळके

संपले स्वप्न ते

संपले स्वप्न ते शोधिसी का पुन्हा
ऐक वेड्या मना..
एक चैत्रात चाहूल आली
वेल भोळी खुलून धुंद झाली
गंध आला वना, जाग ये यौवना
रोमरोमांतुनी गोड संवेदना
लोपल्या त्या खुणा..
आज वसंत शोभा नाही
उष्ण वारे उसासून वाही
भाजणारी हवा, शोष लागे जीवा
चैत्र गेला, क्षणाचा जणू पाहुणा
माळ सारा सुना..
वारी भासात मोहून जावे
एक ध्यासात वेड्या फिरावे
दूर होती कशा, ओळखिच्या दिशा
शून्यता अंतरी, अंधता लोचना
क्रूर ही वंचना..

गीत – शांता शेळके

सांग सांग नाव सांग

सांग सांग सांग सांग

काय रं?

तुझं नाव, तुझं गाव, तुझं नाव, तुझं गाव
नाव सांग सांग सांग, गाव सांग !
चाललीस तुरुतुरु, अढी नगं मनी धरू
सांग सांग सांग, नाव सांग !

जा रं !

गोडंवानी नगं हसू, नाव गाव नगं पुसू
थांब थांब थांब, जरा थांब !
व्हट उघडुन सखू माझ्यासंगं तू बोल
शब्दाशब्दाला घे मोत्यापवळ्याचं मोल
तुझ्या मागं मागं आलो, तुझ्यापायी येडा झालो
नाव सांग सांग सांग, गाव सांग !
नार नवेली मी रूप लाखात एक
जाते जपून जपून तालेवाराची लेक
तुझ्या डोळियाचं बाण, झाला कासावीस प्राण
नाव गाव नगं पुसू थांब थांब थांब !

चाललीस तुरुतुरु
गोडंवाणी नगं हसू
अढी नगं मनी धरू
नाव गाव नगं पुसू

थांब थांब थांब जरा थांब !
नाव सांग सांग सांग, गाव सांग !
जरा थांब थांब थांब, जरा थांब !
घोडं बांध बांध बांध, घोडं बांध !

गीत – शांता शेळके

सांगू कशी प्रिया मी

सांगू कशी प्रिया मी माझे मला कळेना
हळुवार भावना ही शब्दांस आकळेना
एकान्त आगळा हा, ही वेगळीच रात
चाहूल काय बाई बाहेर की मनात
संकोच लाजरीचा अजुनी कसा ढळेना
लज्जा अबोल झाली डोळेच बोलु दे रे
अपुरा अधीर श्वास हृदयास तोलु दे रे
उकलून पाकळी ये परि फूल हे फुलेना

नवखा तुझ्यापरी
मी, नवखी मनात धुंदी
माझ्यातुझ्या सभोवती
भरले धुके सुगंधी
मधुरात मीलनाची
फिरुनी अशी मिळेना

गीत - शांता शेळके

सांज आली दूरातून

सांज आली दूरातून,
क्षितिजाच्या गंधातून !
मनी नकार दाटले हात हातीचे सुटले
मागे वळून पाहता शब्दभाव सर्व पुसले
आले जीवन काळोखे
सारे समोर दाटून !
कळी कळी वेचताना अशी
संध्याकाळ झाली
घराकडे वळणारी वाट अंधारी बुडाली
नामरूपहीन वृक्ष उभे भीती पांघरून !
आतबाहेर घेरून आल्या घनदाट छाया
चुकलेल्या गुरापरी जीव लागे हंबराया
कळी कळी वेचताना
वेळ गेलीसे टळून !

गीत – शांता शेळके

स्पर्श सांगेल सारी

स्पर्श सांगेल सारी कहाणी
शब्द बोलू नकोस आज राणी
संथ सागराच्या लाटा
किनाऱ्यास येती
फेनफुले वाळुवरती
अंथरून जाती
धुंद हृदयातुनी ही आर्त गाणी
हात गुंफिलेले हाती,
फुले लाज गाली
मुक्या भावनांना का ही
नवी जाग आली
जन्मजन्मांतरीची ही विराणी

गीत - शांता शेळके

स्वर्गाहुनही प्रिय आम्हांला

स्वर्गाहुनही प्रिय आम्हांला
अमुचा सुंदर भारत देश

आम्ही सारे एक जरीही नाना जाती नाना वेष
या भूमीच्या आम्ही कन्या कोमल भाव मनी
फूलकोवळ्या तरी प्रसंगी होऊ रणरागिणी
आवेशाने घुसू संगरी चढवुनिया रणवेष
श्रीरामाचे शीकृष्णाचे अजून आहे स्मरण मनास

वीर शिवाजी प्रताप बाजी थोर

आमुचा हा इतिहास

रक्तामधुनी वीज वाहते उरात भरतो नव आवेश

हिमायलापरी शीतल आम्ही,

आग पेटती परि उरात

पाऊल परके पडता येथे बळ वज्राचे याच करांत
या देशाची गौरवगाथा हाच अम्हांला दे आदेश

गीत – शांता शेळके

हा दु:खभोग सारा

हा दु:खभोग सारा माझा मला उरावा
पतिसंगती सुखाने संसार तू करावा !
संपून आज गेली ती प्रीतिची कहाणी
डोळ्यांत ना तरीही मी आणणार पाणी
साहीन मी सदाचा दोघांतला दुरावा
पतिसंगती सुखाने संसार तू करावा !
मी पाहतो मनाने घरकूल साजिरे ते
सौभाग्यसाउलीला तू नांदतेस जेथे
आनंद आसमंती तेथे तुझा भरावा
पतिसंगती सुखाने संसार तू करावा !
अंकावरी तुवा गे निज बाळ खेळवावे
हासू कृतार्थतेचे ओठी तुझ्या फुलावे
ते चित्र पाहताना हा जन्म ओसरावा
पतिसंगती सुखाने संसार तू करावा !

गीत – शांता शेळके

हा माझा मार्ग एकला !

हा माझा मार्ग एकला !
शिणलो तरीही चालणे मला
दिसले सुख तो
लपले फिरुनी
उरले नशिबी झुरणे दुरुनी
बघता बघता खेळ संपला !
सरले रडणे, उरले हसणे
भवती रचितो भलती व्यसने
विझवू बघतो जाळ आतला !
जगतो अजुनी जगणे म्हणुनी
जपतो जखमा हृदयी हसुनी
छळते अजुनी स्वप्न ते मला !

गीत – शांता शेळके

हा मंद मंद वारा

हा मंद मंद वारा, ही धुंद रातराणी
आले तुझ्या स्मृतीने डोळ्यांत आज पाणी !
दाही दिशांमधुनी ये पूर चांदण्याचा
वाऱ्यात गंध आहे हळुवार चंदनाचा
ओथंबली नभाची फुलवेल तारकांनी
आले तुझ्या स्मृतीने डोळ्यांत आज पाणी !
गेल्या मिळून आता छाया परस्परांत
शय्येवरी विसावे प्रीती घराघरांत
मी मात्र भारलेली येथे उभी दिवाणी
आले तुझ्या स्मृतीने डोळ्यांत आज पाणी !
आहेस काय तूही माझ्यापरी उदास?
असशील का अशी तू निरखीत चांदण्यास
नि:शब्द हुंदका तो, येतो कुठुन कानी
आले तुझ्या स्मृतीने डोळ्यांत आज पाणी !
दूरातुनी कुणाची चाहूल काय येई?
ही आस, भास वेडा– वेडीच काय मीही?
स्वप्नात पाहिलेली स्वप्नी उरे कहाणी
आले तुझ्या स्मृतीने डोळ्यांत आज पाणी !

गीत – शांता शेळके

हिरव्या रंगाचा छंद राया

सजणा, छंद माझा पुरवा
मला हिरव्या पालखीत मिरवा !
हिरव्या रंगाचा छंद राया पुरवा
मला हिरव्या पालखीत मिरवा !
हिरवी साडी हिरवी चोळी
हिरवे गोंदण गोऱ्या गाली
हिरवी तीट कुंकवाखाली
घाला वेणीत हिरवा मरवा !
चढवा हाती हिरवा चुडा
अंगठीत पाचुचा खडा
शेल्यावरी हिरवा चौकडा
हिरवा साज मजला करवा !

गीत – शांता शेळके

ऋतु हिरवा
ऋतु बरवा

ऋतु हिरवा ऋतु बरवा, पाचूचा वनि रुजवा
युगविरही हृदयावर सरसरतो मधूशिरवा
भिजुनी उन्हे चमचमती,
क्षण दिपती क्षण लपती
नितळ निळ्या अवकाशी
मधुगंधी तरल हवा
मनभावन हा श्रावण, प्रियसाजण हा श्रावण
भिजवी तन भिजवी मन हा श्रावण
थरथरत्या अधरांवर प्रणयी संकेत नवा
नभी उमटे इंद्रधनू, मदनाचे चाप जणू
गगनाशी धरणीचा जुळवितसे सहज दुवा

गीत – शांता शेळके

क्षणभर भेट
आपुली झाली

क्षणभर भेट आपुली झाली !
ओळख नव्हती मुळीच अपुली
नजर मात्र नजरेला भिडली
खुणा आंतरिक पटुनी काही हसू उमटले गाली
गूढ भाव नेत्रांत तरळले
रहस्य अपुले आपणा कळले
अनोळखीपण आड कशाला येईल मग त्या काली?
दूर उभा तू जरी मजपासुनी
अंतर मधले गेले तुटुनी
स्पर्शसुखाची दुरून आपण अनुभवलीच नव्हाळी
परिचय अपुला नसोच नसला
लौकिक परिचय हवा कुणाला?
युगायुगांची क्षणांत जर का ओळख जिवास पटली

गीत – शांता शेळके

हाऊस ऑफ बॅम्बू

नंबर फिफ्टि फोर, दि हाऊस विथ दि बॅम्बू डा[illegible] !
बांबूचे घर बांबूचे दार बांबूची जमीन पिवळीशार !

बांबूच्या वनात वाऱ्याचा सूर
जिवाला नेतो भुलवुनी दूर !

हाऊस ऑफ बॅम्बू !

बांबूच्या वनात झऱ्याच्या काठी
येशील सजणे माझ्याच पाठी !
बांबूच्या घरात स्वप्नाचा झूला
झुलवित राहील तुला नि मला !

हाऊस ऑफ बॅम्बू !

नंबर फिफ्टी फोर, दि हाऊस विथ दि बॅम्बू डोअर !

बांबूचे घर पहायला हवे
बांबूच्या घरात रहायला हवे !
रूपाचा उजेड डोळ्यांचा दिवा
बांबूच्या घरात तेवायला हवा !

हाऊस ऑफ बॅम्बू !

नंबर फिफ्टि फोर, दि हाऊस विथ दि बॅम्बू डोर !

गीत – शांता शेळके

हा मंद मंद वारा

हा मंद मंद वारा, ही धुंद रातराणी
आले तुझ्या स्मृतीने डोळ्यांत आज पाणी !
दाही दिशांमधुनी ये पूर चांदण्याचा
वाऱ्यात गंध आहे हळुवार चंदनाचा
ओथंबली नभाची फुलवेल तारकांनी
आले तुझ्या स्मृतीने डोळ्यांत आज पाणी !
गेल्या मिळून आता छाया परस्परांत
शय्येवरी विसावे प्रीती घराघरांत
मी मात्र भारलेली येथे उभी दिवाणी
आले तुझ्या स्मृतीने डोळ्यांत आज पाणी !
आहेस काय तूही माझ्यापरी उदास?
असशील का अशी तू निरखीत चांदण्यास
नि:शब्द हुंदका तो, येतो कुठुन कानी
आले तुझ्या स्मृतीने डोळ्यांत
आज पाणी !
दूरातुनी कुणाची चाहूल काय येई?
ही आस, भास वेडा- वेडीच काय मीही?
स्वप्नात पाहिलेली स्वप्नी उरे कहाणी
आले तुझ्या स्मृतीने डोळ्यांत
आज पाणी !

गीत – शांता शेळके

ही चाल तुरुतुरु
ही चाल तुरुतुरु उडती केस भुरुभुरु
डाव्या डोळ्यावर बट ढळली
जशी मावळत्या उन्हात
केवड्याच्या बनात
नागीण सळसळली !
इथं कुणी आसपास ना !
डोळ्याच्या कोनात हास ना?
तू जरा माझ्याशी बोल ना?
ओठांची मोहोर खोल ना?
तू लगबग जाता मागं वळून पाहता
वाट पावलांत अडखळली
उगाच भुवई ताणून
फुकाचा रुसवा आणून
पदर चाचपून हातानं
ओठ जरा दाबीशी दातानं
हा राग जीवघेणा खोटाखोटाच बहाणा
आता माझी मला खूण कळली

गीत – शांता शेळके

हे श्यामसुंदर

राजसा

हे श्यामसुंदर राजसा, मनमोहना
विनवुनी सांगते तुज
जाउ दे मला परतुनी !
गाव गोकुळ दूर राहे
दूर यमुनानीर वाहे
हरवले मी कसे मज
चालले कुठे घनवनी?
पावरीचा सूर भिडला
मजसि माझा विसर पडला
नकळता पाऊले मम
राहिली इथे थबकुनी !
पानजाळी सळसळे का?
भिवविती रे लाख शंका !
थरथरे, बावरे मन
संगती सखी नच कुणी !

गीत – शांता शेळके

ही वाट दूर जाते

ही वाट दूर जाते स्वप्नामधील गावा
माझ्या मनातला का तेथे असेल रावा?
जेथे मिळे धरेला आभाळ वाकलेले
अस्ताचलास जेथे रविबिंब टेकलेले
जेथे खुळ्या ढगांनी रंगीन साज ल्यावा
घे साउली उन्हाला कवळून बाहुपाशी
लागून ओढ वेडी खग येती कोटरासी
एकेक चांदणीने नभदीप पाजळावा
स्वप्नामधील गावा स्वप्नामधून जावे
स्वप्नातल्या प्रियाला मनमुक्त गीत गावे

स्वप्नातल्या

सुखाचा स्वप्नीच वेध घ्यावा

गीत – शांता शेळके

हे बंध रेशमाचे

हे बंध रेशमाचे

पथ जात धर्म किंवा नातेही
ज्या न ठावे
ते जाणतात एक प्रेमास प्रेम द्यावे
हृदयात जागणाऱ्या अतिगूढ संभ्रमाचे
तुटतील ना कधीही हे बंध रेशमाचे !
विसरून जाय जेव्हा माणूस माणसाला
जाळीत ये जगाला
विक्राळ एक ज्वाला
पुसतात डाग तेही धर्मांध आक्रमाचे
तुटतील ना कधीही हे बंध रेशमाचे !
हे बंध रेशमाचे ठेवी जपून जीवा
धागा अतूट हाच प्राणात गुंतवावा
बळ हेच दुर्बळांना देती पराक्रमाचे
तुटतील ना कधीही हे बंध रेशमाचे !

गीत – शांता शेळके

हे रान चेहऱ्यांचे

हे रान चेहऱ्यांचे माझ्या सभोवती
नाही इथे जिवाचा कोणीच सोबती
ही माणसे म्हणू
की ही क्रूर श्वापदे?
भेसूर सावल्या की तिमिरात हालती
घेऊन गूढ पोटी विक्राळशा गुहा
प्रत्येक चेहऱ्याच्या आडून पाहती
दावीत स्वप्नसुंदर ओल्या मरीचिका
येथील पायवाटा दूरात धावती
विश्रब्ध भावनेने टेकिन या शिरा
जागा अशी निरामय नाही कुठेच ती
कल्लोळ गर्जनांचा वाढे क्षणोक्षणी
मी सूर अंतरीचा येथे जपू किती
हे रान चेहऱ्यांचे घेरीत ये असे
माझ्याही चेहऱ्याची
मजला न शाश्वती

गीत – शांता शेळके

आला पाऊस

मातीच्या वासात ग

मोती गुंफीत मोकळ्या केसांत ग !
आभाळात आले काळेकाळे ढग
धारा कोसळल्या निवे तगमग
धुंद दरवळ धरणीच्या श्वासांत ग !
कोसळल्या कशा सरीवर सरी
थेंब थेंब करी नाच पाण्यावरी
लाल ओहळ वाहती जोसात ग !
लिंबोळ्यांची रास कडूलिंबाखाली
वारा दंगा करी जुई शहारली
चाफा झुरतो फुलांच्या भासात ग !
झाडावरी मुके पाखरांचे थवे
वीज लालनिळी कशी नाचे लवे
तेजाळते उभ्या अवकाशात ग !
वीज कडाडता भय दाटे उरी
एकली मी इथे सखा राहे दुरी
मन व्याकुळ सजणाच्या
ध्यासात ग !

गीत – शांता शेळके

मावळतीला गर्द शेंदरी

मावळतीला गर्द शेंदरी रंग पसरले
जसे कुणाचे जन्मभराचे भान विसरले
जखम जिवाची
हलके हलके भरून यावी
तसे फिकटले,
फिकट रंग ते मग ओसरले
घेरित आल्या
काळोखाच्या वत्सल छाया
दुःखाचीही अशी लागते
अनवट माया
आक्रसताना
जग भवतीचे इवले झाले
इवले झाले आणि मजला
घेरित आले
मी दुःखाच्या
कुपीत आता मिटते आहे
एक विखारी सुगंध त्याचा लुटते आहे
सुखदुःखाच्या
मधली विरता सीमारेषा
गाठ काळजातली
अचानक सुटते आहे

जाणिव विरते
तरिही उरते अतीत काही
तेच मला मम
अस्तित्वाची देते ग्वाही
आतुरवाणी धडधड दाबुन
हृदयामधली
श्वास आवरून मन
कसलीशी चाहुल घेई
हलके हलके उतरत जाते
श्वासांची लय
आता नसते भय
कसले वा कसला संशय
सरसर येतो उतरत काळा
अभेद्य पडदा
मी माझ्यातुन
सुटते, होते पूर्ण निराशय

–शांता शेळके

श्रावणसरी

सोशिक माती अशी
सारखी वर्षावाने भिजे
युगायुगांची उत्कट आशा
अक्षर होऊन रुजे
केव्हा हसणे, केव्हा रडणे,
कधी सोसणे कळा
असा चालला इथे
सनातन सृजनाचा सोहळा
कशी मनातून मने गुंतती
भाव दाटती उरी
उन्हात न्हाऊन सुंदर होऊन
येती श्रावणसरी
जळथेंबानी कशी चमकते
सृष्टी ही साजरी
कधी हासऱ्या, कधी लाजऱ्या,
आल्या श्रावणसरी

–शांता शेळके

कर आता
गाई गाई
कर आता गाई गाई
तुला गाते मी अंगाई
आज माझ्या बाहुलीची
झोप कुणी नेली बाई?
बोळक्यांची उतरंडी
लुटुपुटीची चूल
आवरले आहे बाई
आता कुठे घरकूल !
काम सारे उरकता
थकला ग माझा जीव
नको छळू तूही राणी
येऊ दे ना जरा कीव?
नीज नीज लडिवाळे
नको रडू, देते झोका
उभा बागुल दाराशी
सांग त्यास बोलावू का?

गीत – शांता शेळके

४

गजरा

वेलीवरी फुलांऐवजी
फुलतील फुलपाखरे
निळे जांभळे पिवळे दिसतील
रंग किती गोजिरे!

भरभर खुडुनी फूलपाखरे
गजरा मी गुंफिन
निळी जांभळी पिवळी शोभा
वेणीवरी माळीन!

चिमुकलं

चिमुकलं पाखरू
अंगणात आलं
दाणे टिपले
नाचून गेलं

चिमुकलं ऊन
दारातून आलं
भिंतीवर कवडसा
पाडून गेलं

चिमुकलं वारं
झाडात हललं
फांदीवरचं
पान पान डुललं !

चिमुकलं बाळ
रांगत आलं
मांडीवर बसलं
खुदकन हसलं !